भारताक चला !

ले.दिवाकर कारखानिस-ह्युस्टन

शनिवारी ओव्हरटाईम केल्यावर हाशहुश करत मी घरी निघालो. नाहीतरी ऑफिसात चार टोपल्या टाकल्याकी दिवस संपतो.एक दोन कॉफीब्रेक होतातच.काम कधीच संपत नसत. अहो, काम संपले तर आमची कशाला गरज लागते ऑफिसला ? आमचा साहेब तसा अडाणXX च आहे. तो सारखा बायका बदलत असतो. एकीशी जुळलं की पहिलीला हटाव. च्यामारी ! अमेरिकन बायकापण कुचकामाच्या. आमच्या बायका पहा म्हणावं ! नवऱ्यानं जरा इकडं तिकडं पाहिली की गेलीच त्या "भवानीच्या " झिंज्या ओढायला. आमच्या साहेबाचं आपलं बरं. त्या बायकांच्या उलाढालीत हा माणूस इतका गर्क की ऑफिसांत काय चाललंय हे त्याच्या गावीच नसत. 'काम संपल नाही' असं सांगितलं की "शनिवारी O.T. करा आणि संपवा" असा उगाच दम मारतो.आम्ही आपले दोन तास O.T. मारून चार तासाचा पैसा घेतो.नाहीतरी अमेरिकन कंपन्या रगड पैसा मिळवतात की !

शनिवारी दुपारी रस्ते जरा मोकळे झालेले असतात. म्हणून गाडी जरा जोरात चालते. नेहमी पाऊणतास लागतो हायवे ७५वरून वुडस्टॉकला जायला. आता मात्र वीस मिनिटांत घरी पोहचलो. बायको वाट पहातच होती. मोठी नेली (म्हणजे निलीमा) मैत्रिणीबरोबर सिनेमाला गेलेली असते. खरं म्हणजे आमची नेली (निलीमा) आता २२ वर्षाची आहे आणि दर आठवडयाला नवीन Boy friend पकडत असते. धाकटा गॉरी (म्हणजे गिरीश हो) मित्रांबरोबर "अभ्यास" करायला (म्हणजे चकाटया पिटायला) गेलेला असतो. मी गाडी गराजमधे लावतो आणि तिथूनच घरात शिरतो. बायको चहा टाकते. मी हाशहुशकरीत इझीचेअरवर टेकतो.

" आज पमीवहिनीचा फोन आला होता.उद्या रविवार. सकाळीच बोलवलंय तुम्हाला त्यांच्या घरी !"

पमीवहिनी म्हणजे आमच्या वासू नाडकर्ण्याची बायको.वासू म्हणजे वसंता. माझ्या बायकोच्या शाळेत- दादा रेग्यांच्या बालमोहन शाळेतला शाळूमित्र.आमचं लग्न लागलं आणि मग वासूचं लग्न झालं.त्या लग्नाला आम्ही 'सहकुटुंब सहपरिवारे' हजर होतो. बायकोच्या माहेरचा म्हणून आमचा घरोबा जास्त.

" कशासाठी उद्या सकाळी बोलावलय वासूच्या बायकोनं ? काही काम आहे कां? " मी सौ.ला विचारलं.

" मी काही विचारलं नाही पमीला आणि तिनं काही आपणहून सांगितलं नाही. मी कशाला करू चांभार चौकश्या?"

खरं म्हणजे अगदी साधा प्रश्न होता. सरळ उत्तर द्यायला काही हरकत नव्हती.पण बायकोनं नवऱ्याला दुसऱ्या बाईचा निरोप द्यायचा असला म्हणजे नेहमी संशयाला जागा असते. आमच्या हिला ऑफिसमधल्या बॉसच्या सेक्रटरीन केलेला फोनसूध्दां संशयास्पद वाटतो. त्यामुळे पमावहिनींचा निरोप देताना तिन नेहमीप्रमाणं उत्तर दिल.. तिरकस !

काय बरं काम असेल वासूचं ? मागच्याच महिन्यात बायकोच्या नकळत त्याला मी दोनशे डॉलर्स हाताउसने दिले होते. बहुतेक तेच परत करायचे असतील. घरी येऊन दिले तर आमच्या हिला कळलं असत आणि मग दोन दिवस तोच विषय चालला असता..धुसपुसत. जाऊदे. जास्त विचार नको. मी पडल्यापडल्या डुलकी घ्यायचं ठरवल.

दुसऱ्या दिवशी सकाळचा नाश्ता केला.गॅरी आणि नेली अद्याप झोपून उठले नव्हते आणि बारा वाजेपर्यंत उठणार नव्हते.इकडली सगळी कार्टी रात्रीची जाग्रणं करतात आणि दिवसा झोपा काढतात. च्यायला,आमच्यावेळी असं नव्हतं. काय शिशाद लागली आहे आठ आठ वाजेपर्यंत झोपायची. आमच्या तिर्थरूपांनी XXXXलाथ मारून बाहेर काढलं असतं आम्हाला !

वासू नाडकर्ण्याकडे पोहचलो तो अकरा वाजले होते.पमावहिनीनं दार उघडलं. " येवा तुमचीच वाट बघीत हुतंय घटकाभरा धरनं"

आमची पमा वहिनी म्हणजे चालतंबोलतं वर्तमानपत्र आहे.तिची आठवण इतकी जबरदस्त की आता लग्न होऊन ३० वर्ष झाली तरी वासूने ज्ह्या तिला प्रथम मालवणला पाहिलं, त्या दिवसाचं यथासांग वर्णन अगदी तिखटमीठ लावून सांगते. लग्नाच्या पहिल्या रात्रीला वासू कसा घाबरला होता ती हकीगत अगदी खुश्याल हसत हसत सांगते. अमेरिकेत येऊन आता वीस वर्षे झाली तरी घरांत पमी वहिनी आणि वासू मालवणी भाषाच वापरतात. पमीसारखी गोष्टी वेल्हाळ पण प्रेमळबाई अद्याप माझ्या पाहण्यांत आली नाही.

मी डायनिंग टेबलाजवळच्या खुर्चीवर बसलो. माझ्या आधी बापू टकले येऊन बसला होता. पाठोपाठ धनू बेंद्रे आणि नाना सरदेसाई जोडीने आले. नाना आणि धनु अलफर्टाला रहात होते.नाना नेहमी राईडची वाट पहात असायचा.कारण इतके लांब जायच म्हणजे गॅस किती लागणार याचा विचार आधी नानाच्या डोक्यांत यायचा.

“ हॅलो..कसं काय?” होतय् नाही तर पुन्हा बेल वाजली. धनुने जाऊन दार उघडले. बाहेर भावडया पटवर्धन तंबाखूचा तोबरा चघळत उभा होता. त्याला आंत घेतल.

“ काय वहिनी; आज काय बेत आहे ? पोरीच्या लग्नाबिग्नाची तर बातमी द्यायची नाही नां ? अगदी झाडून सगळया खास मित्रांना बोलावलंय म्हणून विचारतोय ?” मी विचारलं.

“ नाय बा..तसा काय नाय. आन ती झील ऐकनार का आमच आता? लई श्यानी झालीसा असू...अम्येरिकन ना ?”

“ तसं नाही वहिनी. सगळयांना एकदम बोलावलं म्हणून जरा शंका आली. पण वासू कुठं दिसत नाही तो ?”

“ ते कोंबडयो आनूक फार्मस मार्किटला गेलेहत. ”

“अरे वा ! म्हणजे मोठा बेत दिसतोय की! पण चिकनचा बेत फक्त तुमच्यासाठी कां आमच्यासाठी सुध्दां ? आणि रेसिपी कोणती? मालवणी कां अमेरिकन ? ”

आमची पमीवहिनी सुग्रण आहे.तिच्याकडच्या माश्याच कालवण किंवा मालवणी पध्दतीच चिकन म्हणजे अगदी ultimate !

“ ना बा.अम्येरिकान..छी थू..!आमी होत मालवणी आन मग चिकन मालवणी ना होत तर काय अम्रेकिन ?आन तुमका सर्वांना बोलावलंय म्हंजे तुमच्यासाठीच इस्पेशल मालवणी चिकन करतासो.”

“ पण वासूने का नाही बोलावलं फोन करून”..धनु बेंद्रे पुटपुटला.

“ तुमी सगळे येतलांस ह्या त्येका ठावकच नाय हा. मी त्येंका सांगलय माझे मारियटाचे चार भाव आज जेवक् येवचे आसत. चिकन घेवन येता.”

“ अरेच्या म्हणजे हा काय प्रकार आहे वहिनी ? समजत नाही. तुम्ही वासूला तुमचे भाऊ येणार म्हणून पिटाळत चिकन आणायला फार्मर्स मार्केटला आणि आम्हाला फोन करून इकडे बोलावलत. काय गौडबंगाल आहे कळत नाही !” नाना सरदेसाई साशंक मुद्रेन माझ्याकडे पहात म्हणाला.

“ प्रकार बिकार काय नाय. ह्येंचा - तुमच्या मित्राचा डोसका फिरला हा.तुमी सर्वे त्याचे जिवभावचा मित्र असा. ता तुमी दोसदारानी ठिकानावर आना.”

“ म्हणजे ? डोकां फिरलंय म्हणजे exactly काय झालंय ?”भावडया पटवर्धन मराठी इंग्रजी बोलला. मधुनमधून त्याला अमेरिकेत असल्याची जाणीव व्हायची आणि इंग्रजी शब्द फेकण्याची सणक यायची.

“ आठ दिवसा माग ते बीएमएम का काय संमेलनाला गेल्लल अटलांटाला. ता संमेलन बघून इल्या पासून ह्येंचा सटाकला.”

“ काय म्हणतेस काय वहिनी तू हे ? ”

“ ते दिवस बीएमएम का फीएमएम परदर्शनाहून ही..पापलेटा घेऊन इले ”

“ पापलेट ! आणि BMM convention मधून ? आणि परवानगी दिली पापलेट विकायला ? कुणी दिली ..who..who gave the permission ? बहुतेक त्या अण्णा सरदेशमूखाचा हात असावा त्यांत ! C.K.P. नां ? मासळी शिवाय प्राण जाईल त्यांचा !” भावडया पटवर्धन सात्विक संतापाने बोलला.

“ भावडया, अरे असं भलतंसलत काय बोलतोस ? BMM नुकसानीत गेलं म्हणून काय पापलेट विकतील ? अरे ती पापलेट नसतील पॅमप्लेटस असतील pamphlets.” धनंजयने खुलासा केला.

“ होय होय. त्येच..त्येच मी म्हन्ते. आनि दिवसभर ती वाचीत हुते मगे सांजला म्हंतत मी नोकरी सोडतंय आणि परत भारताक जावून माणगांवाक शेती करतंय ”

“ अससं ? बापू टकले आश्चर्याने म्हणाला. बापू टकले म्हणजे अगदी सिरीयस माणूस. तो हंसला तर चंद्रसुध्दा लाजेल असं त्याची बायको थट्टेने म्हणते.

“ तर वो ! मी म्हतला. तुमका काय याड लागला की काय? आजून चेडवाचा लगीन होवचा आसा. झिलाक नोकरी लागाची आसा आनि तुमी नोकरी सोडून भारताक जातंलसा ?”

“ मग काय म्हणाला तो ? “ नाना सरदेसायानं विचारलं.

“ म्हंतत आता माजी बासस्टीची डमर जाली.मी रिटायर जालो की माका पेन्शण मिळल गवरमेंटची..सोशल का काय म्हनतात त्ये ! चेडवा जाली पंचवीस वर्सांची.ती काय आपल्या ताब्यात नाय. तिचा ती पाहून घिल.माका पेन्शनचा हजार डालर मिळत्याल. तेतूर दोघांचा कसाव भागात. शिवाय शेती असाच माणगांवला.”

आम्ही एकमेकांचे चेहरे निरखीत होतो.

" मी इच्यारलंय. मगे झिलाचा काय? तर म्हतंत त्येका मोठो केलंय. शिक्षान दिलंय़. ह्ये घर घेवन ठेवलं हाय. आता नोकरेचा त्येचा त्येना बघूचा. "

भावडयाने मान हालवली. नाना सरदेसाई पुढे सरसावून म्हणाला,

"यात काही चूक आम्हाला तरी दिसत नाही. बापाची सगळी कर्तव्ये त्याने पुरी केली आहेत."

" चूक नाय कशी भावोजिनू ? आजकल सजासजी नोकऱ्यो गावतंहतं ? त्या काम्पुटरचा लोकशी बेकार जालं असा.तो झीलतर आपला यत्न करताच. ह, पर ह्येनी पन थोडोफार लक्ष घालूक नको ?

" योग्य आहे तुमचं म्हणणं पमा वहिनी. तुमच्या सॅमचं शिक्षण पुरं होऊन त्याला नोकरी लागेपर्यंत आणि भू..च (भुलूच) लग्न होईपर्यंत इथून हालणं मूर्खपणाचं ठरेल. आणि आता भारतांत सुध्दा परिस्थिती बदलली आहे."

" होय की नाय ? मी पन याच सब्दांत त्यांका सांगलय तर घर टकलेर घितल्यानी आन म्हनाले , माका मूर्ख म्हंतस ? गेली पंचवीस वर्सा ह्यो मूर्खच या घराचो गाडा चालवताहा ना. आनि मग तोंडा ज त्वांडा बडबडाक लागले. अकरेक मी पाया पडलंय तवा गप झाले."

मी पण BMM Conventionला अटलांटाला गेलो होतो. त्यावेळी तिथे कॉंग्रेसच्या लोकांनी औद्योगिक आणि शेतकी क्षेत्रांत भारताने किती प्रचंड प्रगती केली आहे याची खुप माहिती दिली होती.मुख्यमंत्री आणि डॉ. माशेलकरांनी रंगवलेले भारताच्या भवितव्याचे चित्र अत्यंत प्रभावी होते. डी.के.कुळकर्णी आणि परांजपेस्कीमवाले यांनी अनिवासी भारतीयांसाठी सुंदर आणि सुसज्ज वसाहती निर्माण करण्याचे नकाशे आणि इतर माहिती पुरविणारे फलक लावले होते.हे सर्व पाहून भारताच्या प्रगती बद्दलचा अभिमानयुक्त आनंद होत होता.पण वासू नाडकर्णीसारखा भावनाविवश होऊन तडकाफडकी अमेरिका सोडून जाण्याचा आत्मघातकी निर्णय कुणीही घेतलेला नव्हता. गेल्या तीसचाळीस वर्षात भारतांत अनेक दृष्टीने बदल झाले होते. योग्य अनुभवा शिवाय शेतकी अगर बागायती करणे किंवा नवीन कारखाना काढणे़ किती कठीण आहे याची कल्पना इथे राहिलेल्यांना नसते.तसेच सध्यातरी हिंदुस्थानांत कोणत्याही धंद्यात, सरकारी नोकरदारांचे हात ओले केल्या शिवाय पान हालत नाही. अशी परिस्थिती असताना वासूने खोल विचार न करता असा निर्णय घेणे म्हणजे स्वतःच्या हाताने स्वतःच्याच पायावर कुऱ्हाड मारून घेण्यासारखे होते.

इतक्यांत वासू गाडी गराजमध्ये पार्क करून आला. घरात आम्हा पांचजणांना पाहून तो आश्चर्यचकीत झाला.

"अरे वा, तुमी पण इलाहास ? बरा झाला."
" Waoo! आणखीन कोण येणार आहे ?" भावडयाने चकीत होऊन विचारले.
" माजे मेवने पन येवचे आसत आज."
हे ऐकून पमावहिनी हिः.. हि..करून हसली.
" हसतेस कित्या ?" वासूने शॉपिंगची पिशवी तिच्या हातांत दिली. " जावा, ह्या चिकन काढून ठेव आनि परात पिशवी दी हकडे".
" कित्या ?" पमावहिनीनी विचारल.
"कित्या म्हंजे?" आमच्याकडे बोट दाखवून " ह्येंका पन जेवनच धाडूया. आनकी दो चिकन घेव्न येतंय."

पमावहिनी परत फिस्कन हसली.

" आज तुका हंसाक काय झाला..हां ?"
" अवो. हेच माझे भाव येवते हुते. ह्येंच्यासाठीच चिकन आनूक सांगलय."
" म्हंजे तुझे सक्के भाव विनू, सख्या, गज्या, भाग्या नाय येतले? "
" नाय."
" बरा जाला. ते इले मंगे त्येंच्या बरोबर काय बोलायचा असो प्रश्न पडता. बघुचे तेबा स्वताक लई शाने आनि माका गाढव- अडाणी समजान उपदेस करीत आसतंत."
" हो ना. आज आम्ही तेच करायला आलो आहोत.. उपदेश.. sermon... कळलं ? " भावडया पटवर्धनने सांगून टाकलं.
" म्हंजे ? ' काहीही न कळल्यामुळे वासूने विचारलं.
" तू बस. फार दमून आला असशील तू ! कुठे कुठे गेला होतास चिकनच्या शोधार्थ ? फार्मर्स मार्केटला चांगल्या मिळतात चिकनस." नाना सरदेसायाने माहिती पुरवली.

वासू नाडकार्णीच्या घरातले ते डायनिंग टेबल चांगले आठ माणसांना बसण्यायोग्य होते. वासू टेबलाच्या शिरोभागी असलेल्या खुर्चीवर बसला. मी आणि धनंजय त्याच्या उजव्या बाजूला आणि नाना आणि टकले डाव्या बाजूला. वासूच्या समोर भावडया पटवर्धन. अशी आमची गोलमेज परिषद भरली.

" मग आज काय विशेष करून आलास ?" मी वासूला प्रश्न विचारला.
" आज मी फार्मस मारकिटला ग्येला व्हता. तवा तिथ तो आपला राजू वेदक भ्येटलानी. त्यान माका आपाल्या देशात शेतकी क्षेत्रात किती सुधारना झाल्लली आसा त्या सर्व सांगितला. ते ऐकून मी येडोच झालंय."
" ते दिसतंय आम्हाला ! " टकलेनं पुटका टाकला.
" तुमका कसा कळलां ?" वासूने टकलेला प्रश्न केला.

“ कळलं सर्व कुणाकडून तरी. तू नोकरी सोडून माणगांवला शेती करायला जाणार आहेस. अमेरिका सोडणार आहेस..”

“ माझो तसो इच्चार आस ही गोष्ट खरी.पन पाय खेचनारी मान्सा काय थोडी आसत ?”

“ कोण खेचतय तुझे पाय मागे ?” भावडया तावातावाने बोलला.

“ पैली म्हंजे माजी बायको..तुमची पमावैनी. साली पंचविस वर्षाहून आदिक नोकरी केली आनि किती नोकरी करायची ? साली गुलामगिरी ! म्या ठरीवल्यान..आता यापुड शेती करायची..आपलीसोताची माती रगडाची..सोनं काडाच.”

“ अरे पण इथली चांगली नोकरी सोडून भारतांत शेती करायला जायचा विचार करायची काय गरज ? आणखी तीन वर्षानी तुला फुल सोशल सिक्युरिटी मिळेल. आता घेतलीस तर ८० टक्केच नाही का मिळणार ?”नाना सरदेसाई समजावणीच्या सुरात म्हणाला.

“ पैली गोष्ट म्हंजे माका आता अमेरिकेचा कंटाळा इलो हा. काय आसा इथं येगळा ? दुसरी गोष्ट म्हंजे माझी सोन्यासारखी जमीन आज किती वर्सा पड आसा.त्या राजू वेढकान माका मार्ग दाखवलंलो आसा. आता मी त्या मार्गात जावचा नक्की केलं हय. एक मिनिट थांब. ” असं म्हणून वासू उठला आणि तरातरा आंत जाऊन त्यानं एक जाड फोल्डर आणला. त्या फोल्डरमध्ये BMM convention मध्ये जमा केलेली सर्व माहितीपत्रके व्यवस्थित लावून ठेवलेली होती. टेबलावर त्याने तो फोल्डर उघडला आणि एकएक माहितीपत्रक आम्हाला दाखवित म्हणाला.

“ ही सगळी भाजीपाल्याची म्हायती.ही शेतीची, बिबियाणाची. आन ही म्हायती फळझाडाची.पोल्ट्री, दूधडेरीची म्हायतीपत्रका पन मी घेवन इलंय.मी त्येचो अभ्यास करतंहय, गनित करतंहय.”

त्याच्या हातातला फोल्डर मिटून बाजूला ठेऊन भावडया पटवर्धन बोलायला लागला.

“ वासू, for argument sake, तू म्हणतोस ते सर्व जरी खरं आहे असं जरी गृहीत धरलं तरी at this present juncture, तू आपल्या फॅमिलीची responsibility टाळू शकतोस कां ? थोडक्याकरता चांगली नोकरी सोडून, शेती करण्यासाठी भारतांत परत जाणे खात्रीने wise decision नाही असं आम्हाला वाटतं. शेती,उद्योगधंदा यांना माणसांची मदत लागते. स्वताःची अंगमेहनत लागते. ती घ्यायची तुझी तयारी आहे कां या वयांत? Are you physically fit for that.. now?”

“ या बघा पाच पांडवानू. तुमचे वैनीन तुमका जेवक बोलावल्यान म्हनान तुमी तिच्या सारख्याच बोलाक व्हया असा काय नाय. ”

“ वासू. वहिनीनी जेवायला बोलावलं म्हणून किंवा त्यांनी पढवलं म्हणून आम्ही हे बोलतोय असं बिलकुल नाही.”

“ नाय तर काय? माजा हयो फोल्डर धड उघडून पन बगितला नाय, वाचला नाय आनि माझ पाय पाठी खेचताहास?” वासू आता चिडला होता.

“ No.. no.. no. That's not right. Please don't misunderstand us”
भावडया गंभीरपणे म्हणाला.

“ अरे. सध्या या देशाची परिस्थिती लई बिघाडली आसा.रोज खयना खय खुन, मारामारी,दरोडे , ड्रग्ज होयतंच आसतंत. त्यो न्युयार्कला झालला बॉबस्फोट..समदा नक्शाच बदलला आसा देसाचा !. आन आता त्यो इराकचो झगडा.कित्याक सैनिक फुकटचा मरत्याल.डिमाकसी..खनची डोंबलाची डिमाकसी..आपला झयला थोडा आन यायान धाडला घ्वोडा ! या जगात कुनीबी खराब नाय आन कुनिबी लई चांगलाबी नाय ! वाईट चाललाय..लई वाईट चाललाय अमेरिकाचा. महागाय तर इतकी वाढली हा की किती कमावला तरी पुरत नाय.त्यापरीस आपल्या गावी जावन श्येती करून प्वाट भरन्याशिवाय दुसरो पर्याय नाय.या नाय तर फुडच्या वर्साक मी भारतात जातंलंयच ”
तो अगदी ठाम निश्चयाने म्हणाला.

“ म्हणजे तू आमचं मुळीच ऐकायला तयार नाहीस तर ?”

“ मुळीच नाय. मी तर म्हनान तुमी पन भारतांत चला. आपल्या देशात चला. मायमाऊलीला भ्येटा.सोता आपल्या श्येतात काम करा. अमेरिकेचा ह्यो नकली नाद सोडा.”

“ तरी पण वासू आम्हाला वाटतं की पासस्टीला रिटायर होईपर्यंत तू हा नाद सोडावास. एकतर तुला पुरी सोशल सेक्युरिटी मिळेल आणि दुसरं म्हणजे तुझे मेडीकेअर सुरू होईल. भारतांत तुला अशी व्यवस्था मिळणार आहे कां? नाना सरदेसाई शेवटचा प्रयत्न करीत होता.

“ चला. ताटा वाढलंहंय. जेवक येवा.” वहिनीनी ऑर्डर सोडली.

“ चला, भारताकडं वळनाऱ्या माझ्या पायावर घाव घालन्यापेक्षा चिकनच्या तंगडीवर ताव मारा” वासू म्हणाला.

हे सगळं पुराण झाल्या मुळे वासूकडे आता जेवू नये अस मनाला चाटून गेलं. पण किचनमधून जो मालवणी चिकनचा फर्मास वास सुटला होता आणि बरोबर तळलेल्या बाजरीच्या वडयांचा खरपूस वास नाकात शिरल्याबरोबर आमचे अवसान बारगळले. किचनटेबलावर हात धुवून बसताबसता मी पमावहिनीला म्हणालो ,

“वहिनी, वासू काही आमचं ऐकत नाही. तुमचा चिकनचा खर्च वाया गेला.”

“ जाव दे भावोजी, पुढल्या वर्सा हे पोल्ट्री काढतंले. मगे काय खर्च नाय. कोंबडी घरचीच आनि खाणारबी घरचंच.” असं म्हणून वासूकडे पहात फिस्कन हंसल्या.

Dickinson